# <u>प्रेसनोट</u>

दि. २३/०८/२०२३

**पुणे महानगरपालिकेच्या व्हेईकल डेपो, गुलटेकडी, पुणे येथील स्टार्टर (वाहन वाटप) कर्मचा-यावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २८७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | पांडुरंग साधू लोणकर, वय ५७ वर्ष, पद - स्टार्टर (वाहन वाटप) वर्ग-३, नेमणुक - पुणे महानगरपालिका, व्हेईकल डेपो, गुलटेकडी, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/- रुपये (चार हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- रुपये (चार हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दिनांक २०/०८/२०२३ |
| सापळा दिनांक | २२/०८/२०२३ |

ठिकाण :- क्वालिटी स्पेशल चहाची टपरी समोर, शंकर शेठ रोड, स्वारगेट, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे खाजगी कंत्राटी वाहन चालक असून, पुणे मनपाच्या गुलटेकडी येथील व्हेईकल डेपोमधील लोकसेवक पांडुरंग लोणकर यानी मनपाच्या गाडीवर दररोज काम नेमून देण्याकरीता ४,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक पांडुरंग लोणकर यांनी तक्रारदार यांचेकडे पुणे मनपाच्या गाडीवर दररोज काम नेमुण देण्याकरीता ४,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, ४,०००/- रुपये (चार हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यामध्ये त्याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.